मा. L.O.जी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** पलूस

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0101 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/05/2024 02:44

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7, 7 अ. |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 14/05/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 14/05/2024

**Time From (वेळेपासून):** 12:52 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:51 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/05/2024 **Time (वेळ):** 02:44 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/05/2024 02:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पलूस ,पलूस

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**

**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** पलूस

**District(State) (जिल्हा(राज्य)):** सांगली(महाराष्ट्र)



Scanned with OKEN Scanner

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): हणमंत तुळशीराम तांदळे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1974
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तुरची तातासगाव जि सांगली,पलूस ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | तुरची तातासगाव जि सांगली,पलूस ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.):

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. तानाजी शामराव पवार | | वडील का नाम : शामराव पवार | 1. रा पवार गल्ली, कनेगाव ,ता वाळवा, जि सांगली,,पलूस , सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | खाजगी इसम प्रसाद गजानन चव्हाण | | वडील का नाम : गजानन चव्हाण | 1. वार्ड नं 5 बुर्ली, ता पलूस ज,ता पलूस ,पलूस ,सांगली,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम7500/ रू. (सात हजार पाचशे रुपये) | 7,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

7,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि. 15.05.2024

मी हणमंत तुळशीराम तांदळे, वय 50 वर्ष व्यवसाय - शेती रा. तुरची कारखाना, तुरची ता.तासगाव जि. सांगली. मो.नं. 9112107005.

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास आहे. आमचे गांवात माझा जवळचा मित्र अमोल हरिभाऊ चव्हाण हा त्याचे कुटुंबासह राहण्यास आहे. मित्र अमोल चव्हाण यांने पलूस गांवचे हद्दीतील गट नं.556 मधील 1.5 गुंठे जमिन दि. 04.04.2024 रोजी दुय्यम निबंधक कार्यालय पलूस येथे दस्त क्र.1400/2024 अन्वये दस्त करुन खरेदी केली आहे. सदर खरेदी दस्ताचा ऑनलाईन फेरफार दि.04.04.2024 रोजी 7/12 उतारा सदरी नोंद होणेसाठी तलाठी पलूस यांचकडे आलेला होता. त्याप्रमाणे तलाठी पलूस यांनी नोंद धरुन नोंद मंजुरी करीता मंडल अधिकारी पलूस श्री तानाजी पवार यांचे कार्यालयाकडे ऑनलाईन पाठवलेली आहे. सदर नोंद मंजुर करण्यासाठी मंडल अधिकारी श्री तानाजी पवार व त्यांचे हाताखाली मदतनीस म्हणून काम करणारे खाजगी इसन प्रसाद गजानन चव्हाण यांनी माझ्याकडे दि.13.05.2024 रोजी 10,000/- रूपये लाचेची मागणी केली. आम्हाला मंडल अधिकारी श्री तानाजी पवार व त्यांचे हाताखाली मदतनीस म्हणून काम करणारे खाजगी इसम प्रसाद गजानन चव्हाण यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.13.05.2024 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री. संदीप पाटील, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांना संपर्क करून माझी मंडल अधिकारी श्री तानाजी पवार व त्यांचे हाताखाली मदतनीस म्हणून काम करणारे खाजगी इसम प्रसाद गजानन चव्हाण यांचेविरूध्द लाच मागणीबाबतची तक्रार कळवली. त्यावेळी पाटील साहेब यांनी पथकासह पलूस एमआयडीसी येथील पाण्याचे टाकी जवळ दि.14.05.2024 रोजी सकाळी 11.00 वा चे सुमारास येत असल्याचे सांगून सदर ठिकाणी मला हजर राहण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी माझेकडील हिरोहोंडा एस.एस. मोटार सायकल नंबर - एम.एच. 10 बी. 2110 वरुन दि. 14.05.2024 रोजी सकाळी 11.00 वाजता एमआयडीसी पलुस येथील पाण्याचे टाकी जवळ जावून पाटील साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला त्यांचेकडील शासकीय वाहनामध्ये बसण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी त्यांचेकडील वाहनामध्ये बसलो. त्यावेळी पाटील साहेब यांनी सोबत असले पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय पुजारी साहेब व सापळा पथकाची व दोन सरकारी पंचांची ओळख करून दिली. त्यानंतर मी पाटील साहेब व पंचांना माझी मंडल अधिकारी श्री तानाजी पवार व त्यांचे हाताखाली मदतनीस म्हणून काम करणारे खाजगी इसम प्रसाद गजानन चव्हाण यांचेविरूध्द लाच मागणी बाबतची तक्रार समक्ष सांगितली असता, पाटील साहेब यांनी मला लेखी तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्यावेळी मी त्यांना माझी शाळा इयत्ता सहावी पर्यंत झाली असुन मला वाचता येते परंतु लिहीता येत नसल्याचे सांगीतल्याने पोलीस निरीक्षक श्री दत्तात्रय पुजारी साहेब यांनी मी सांगीतल्या प्रमाणे त्यांचे हस्ताक्षरात तक्रार लिहीली. पुजारी साहेबांनी लिहीलेली तक्रार पोलीस उप अधीक्षक श्री पाटील साहेब व दोन्ही पंचानी वाचून त्यावर सह्या केल्या.

त्यानंतर मंडल अधिकारी श्री तानाजी पवार व त्यांचे हाताखाली मदतनीस म्हणून काम करणारे खाजगी इसम प्रसाद गजानन चव्हाण यांचेविरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने पाटील साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली व सदर कारवाईसाठी पंच नं. 1 म्हणून श्री. रोहीदास शिवराम कोलप यांनी व पंच नं.2 म्हणून श्री.



Scanned with OKEN Scanner

अतिक रफिक बलबंड यांनी काम करण्याचे निश्चित केले.
त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 कोलप असे माझेकडील हिरोहोंडा एस.एस. मोटार सायकल नंबर - एम.एच. 10 बी. 2110 वरुन रवाना होवून तहसिल कार्यालय पलूस येथे दाखल झालो. मी व पंच कोलप असे चालत तहसिल कार्यालयातील मिटींग हॉलमध्ये जाऊन मंडल अधिकारी तानाजी पवार यांची भेट घेऊन त्यांचेशी कामा बाबत चर्चा करुन "या जरा बाजुला या बोलायच हाय" असे सांगीतले, त्यावर त्यांनी मला बोला की काय बोलायचं हाय असे म्हणुन सदर ठिकाणी हजर असले खाजगी इसम प्रसाद चव्हाण यांचेकडे बोट करुन तुम्हाला यांन सांगीतल नाही काय असे विचारले असता त्यावर मी त्यांना "न्हाय काय सांगीतल, सांगा की" असे म्हणालो असता त्यांनी "मी कुणाला डिमांड करत न्हाय" असे म्हणुन खाजगी इसम प्रसाद चव्हाण यांचेकडे बोट करुन "त्या माणसालाच विचारा" असे म्हणालेने मी व सदर इसमाला नवनाथ असे संबोधुन आम्ही बाजुला जावुन चर्चा केली. परंतु सदर इसमाचे नांव नवनाथ नसुन प्रसाद चव्हाण असल्याचे मला नंतर समजले. खाजगी इसम प्रसाद चव्हाण मला "सगळयांच मिळून दहा पर्यत करा" असे सांगीतले. त्यावर मी त्यांना "दहा नगो, दहा हजार एवढ जास्त हुत्यात, साडे सात पर्यत करा" अशी विनंती केली खाजगी इसम प्रसाद चव्हाण यांनी माझी विनंती अमान्य करुन "दहा हजार रुपये" घेऊन येण्यास सांगुन दहा हजार रुपये लाचेची मागणी केली. त्यावर मी पुन्हा खाजगी इसम प्रसाद चव्हाण यांना सात हजार रुपये पर्यत करणे बाबत विनंती केली असता प्रसाद चव्हाण. यांनी पाचशे रुपये त्यांचेसाठी व सात हजार रुपये मंडल अधिकारी तानाजी पवार यांचेकरीता असे एकुण साडे सात हजार रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम लागलीच घेवुन येण्यास सांगीतले. त्यानंतर मी व पंच कोलप असे माझेकडील मोटार सायकलने तहसिल कार्यालय पलूस येथून रवाना होवून पाटील साहेब व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर पाटील साहेबांनी मला व पंच कोलप यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.
मी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने पाटील साहेबांनी मंडल अधिकारी श्री तानाजी पवार व त्यांचे हाताखाली मदतनीस म्हणून काम करणारे खाजगी इसम प्रसाद गजानन चव्हाण यांचेकडे केले पडताळणी कारवाईमध्ये, मंडल अधिकारी श्री तानाजी पवार यांचे हाताखाली मदतनीस म्हणून काम करणारे खाजगी इसम प्रसाद गजानन चव्हाण यांनी माझा मित्र अमोल चव्हाण यांने खरेदी केलेल्या जमीनीची तलाठी पलूस यांनी धरलेली नोंद मंडल अधिकारी श्री तानाजी पवार यांना सांगुन मंजुर करुन घेण्यासाठी स्वत:करीता व मंडल अधिकारी तानाजी पवार यांचेकरीता 10000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती मंडल अधिकारी तानाजी पवार यांचेकरीता 7000/- रुपये व स्वत:करीता 500/- रुपये अशी एकुण 7500/- रुपये लाचेची मागणी करून लाच रक्कम तहसिल कार्यालय पलूस येथे लागलीच घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने पाटील साहेबांनी सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करुन लाच म्हणुन द्यावी लागणारी रक्कम 7500/- रुपये हजर करण्यास सांगीतले.
त्यानंतर मी लाच म्हणुन द्यावी लागणारी माझेकडील शिल्लकीतील 7500/- रुपये रक्कम पाटील साहेब यांचे समक्ष हजर केले. त्यानंतर श्री. पाटील साहेब यांनी लाच रक्कमेतील नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर दोन्ही पंच, श्री. पाटील साहेब व मी सही केली. श्री.पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यामध्ये ठेवल्या व पाटील साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच कोलप असे माझेकडील हिरोहोंडा मोटार सायकलवरुन रवाना होवून तहसिल कार्यालय पलूसच्या गेट समोर आलो. त्यावेळी सदर ठिकाणी खाजगी इसम प्रसाद चव्हाण हे थांबलेले दिसले त्यांनी आम्हाला मोटार सायकल पुढे घेण्यास सांगीतली त्याप्रमाणे मी मोटार सायकल एम.आय.डी.सी. कडे जाणारे रोडने पुढे घेवुन काही अंतरावर थांबवली. त्यावेळी खाजगी इसम प्रसाद चव्हाण त्यांचे मोटार सायकल वरुन आमचे जवळ आले व त्यांनी आम्हाला "तुमचीच वाट बघत होतो" असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना "सर्कल गेले काय?" असे विचारले असता, त्यांनी "गेले" असल्याचे सांगीतले. त्यावर मी त्यांना नवनाथ भाऊ असे संबोधुन गार घेण्यास हॉटेलमध्ये येण्याबाबत विनंती केली. त्यावेळी त्यांनी ते नवनाथ नसल्याचे मला सांगुन"पायाला लागले" असल्याचे सांगीतले व गार घेण्यास हॉटेलमध्ये येण्यास नकार दिला व मला हाताने खुणवुन "मोहर आणले काय?" असे विचारले असता, मी त्यांना "आणले" असल्याचे सांगीतले. खाजगी इसम प्रसाद चव्हाण यांनी मला "द्या की"



Scanned with OKEN Scanner

असे म्हणुन लाचेची मागणी केली. मी माझे पॅन्टचे उजवे बाजुचे खिशात अँथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम उजवे हाताने बाहेर काढुन खाजगी इसम प्रसाद चव्हाण यांचे समोर धरली व त्यांना "साडे सात हायत, मोजुन घ्या" असे सांगीतले. खाजगी इसम प्रसाद चव्हाण यांने लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्यांचे पॅन्टच्या उजवे बाजुच्या खिशामध्ये ठेवली व सर्कलला फोन करुन सांगतो असे म्हणाले. मी त्यांना पवार सर्कलला किती देताय असे विचारले असता त्यांनी "सगळच मी देणार" असे म्हणाले, मी त्यांना "सगळच कशाला देताय त्याला" असे म्हणालो असता त्यांनी "सगळ म्हणजे पाचशे रुपये मी ठेवुन घेणार" असे म्हणुन त्यांनी त्यांचे मोबाईल फोन वरुन मंडल अधिकारी तानाजी पवार यांना फोन करुन मोबाईलचा स्पिकर फोन ऑन केला, मंडल अधिकारी तानाजी पवार यांनी खाजगी इसम चव्हाण याचा कॉल स्विकारला त्यावेळी खाजगी इसम चव्हाण यांनी "गेला काय, रावसाहेब, काम होत जरा" असे म्हणाले, त्यावर मंडल अधीकारी पवार यांनी "काय काम होत" असे खाजगी इसम चव्हाण यांना विचारले, खाजगी इसम चव्हाण यांनी माझा परिचय मंडल अधिकारी पवार यांना देवुन फेरफारचे काम असले बाबत सांगीतले. त्यावर मंडल अधिकारी पवार यांनी खाजगी इसम चव्हाण यांचेशी फेरफारचे नंबर व गांवा बाबत चर्चा केली. मंडल अधिकारी पवार यांनी मला "मगाशी आलता तेच काय तुम्ही" असे विचारले. मी त्यांना "हा" असे सांगुन "नानाची आणि माझी काय भेट झाली नसल्याचे सांगुन नवनाथ याचेकडे साडे सात हजार रुपये दिले" असल्याचे सांगीतले. मंडल अधिकारी तानाजी पवार यांनी "ते घेऊन या इकड नवनाथला फोन करा " असे म्हणुन मंडल अधिकारी तानाजी पवार यांनी लाचेची मागणी केली. त्यावर खाजगी इसम प्रसाद चव्हाण यांनी "माझेकडे दिले" असल्याचे मंडल अधिकारी तानाजी पवार यांना सांगीतले. मंडल अधिकारी तानाजी पवार यांनी खाजगी इसम प्रसाद चव्हाण यांना "तुमच्याकडं दिलेत" असे विचारले, खाजगी इसम प्रसाद चव्हाण यांनी "हं" असे म्हणल्या नंतर त्यांना "बरं..बरं ठेवा तुमच्याकडं" असे सांगीतले. खाजगी इसम प्रसाद चव्हाण यांनी "ठिक हाय" असे सांगीतले. नोंदीचे कामा बाबत चर्चा होऊन फोन वरील संभाषण संपले. खाजगी इसम प्रसाद चव्हाण यांनी मला "आता कुठं पलसात जाणार काय" असे विचारले, मी त्यांना "सरबत पिऊ की" असे विचारले, असता त्यांनी "नको, जातो, मला तुमच्या इच्छेने द्या पाचशे रुपये" असे म्हणुन माझ्याकडे पाचशे रुपये लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना "माझ्याकडं आता तेवढंच न्हाय हायत" असे सांगीतले. खाजगी इसम प्रसाद चव्हाण यांनी "जाऊ" असे मला विचारले. लागलीच मी माझेकडील हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारले बाबत पुर्व नियोजीत इशारा केला. लागलीच सापळा पथक माझेजवळ आले व पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला बाजूला जावून थांबण्यास सांगितले. सापळा पथकाने मंडल अधिकारी श्री तानाजी पवार यांचे हाताखाली मदतनीस म्हणून काम करणारे खाजगी इसम प्रसाद गजानन चव्हाण यांना ताब्यात घेतले.

पासून पान नं 2जोडण्यात आले आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRAVIN Pundlik SALI
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPPPSM8105



Scanned with OKEN Scanner